झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.

जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-१/५४८ /२०२३

दिनांक : २२ /०५ /२०२३

# झोपडपट्टी निर्मुलन आदेश

**(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ड अन्वये अंतिम अधिसूचना)**

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमूद गाव पर्वती, स.नं.८०,८१, सि.स.नं.२१९२/१ ते २१९२/१३ पै., टांगेवाला कॉलनी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या पूर्ण झोपडपट्टी क्षेत्रावर एकूण क्षेत्र ४२४७.१६ चौ.मी (यापुढे ज्याचा उल्लेख 'सदर क्षेत्र' असा करण्यात आला आहे.) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे.गंगा कन्स्ट्रक्शन्स, यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे जा.क्र.झोपूप्रा/ता/प्रस्ताव/मा.क्र.२८०/७५२/२०२२ दि.१४/०६/२०२२ रोजी प्रस्ताव दाखल केलेला असून सदर प्रस्तावास झो.पु.प्रा., पुणे कडील नियमावली, २०१४ यातील नियम क्र.४(५) च्या तरतूदीनुसार जा.क्र.झोपूप्रा/नगररचना/मा.क्र./१२३२/२०२२ दि.०२/०९/२०२२ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

ज्याअर्थी, सदर क्षेत्रातील झोपडपट्टीचे सर्वेक्षण करण्यात येऊन झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट २) तयार करण्यात आली असून उक्त परिशिष्ट २ नुसार सदर मिळकतीवर एकूण १८१ झोपडया असून त्यापैकी निवासी पात्र १४१, अपात्र १० व बंद १० आणि बिगरनिवासी पात्र ०२, अपात्र १५ आणि सार्वजनिक बांधकामे एकूण ०२ या प्रमाणे एकुण पुनर्वसनास पात्र झोपडीधारक १४३ तर अपात्र झोपडीधारक ३५ इतके ठरले आहेत; आणि

ज्याअर्थी, सदर क्षेत्र उक्त अधिनियमाच्या कलम ३क अन्वये पारित आदेशाद्वारे **झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र** म्हणून घोषित करण्यात आले असून सदरचा अंतिम आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र दि.३०/१२/२०२१ ते ०५/०१/२०२२ रोजी पृष्ठ क्र. ४ व ५ वर आणि दैनिक लोकमत व दैनिक विश्वेश्वर या वृत्तपत्रात दि.२९/१२/२०२१ रोजी प्रसिध्द करणेत आलेला आहे. तसेच सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा रितीने योजनाक्षेत्रात दि.२३/१२/२०२१ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आलेला आहे;

ज्याअर्थी, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत शिखर तक्रार निवारण समिती अथवा कोणत्याही न्यायालयाचा स्थगिती आदेश नाही आणि म्हणून, झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील इमारती / झोपड्या पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणे व उक्त अधिनियमाच्या कलम ३ड अन्वये पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे; आणि

ज्याअर्थी, विकसक मे.गंगा कंन्स्ट्रक्शन्स् यांचेमार्फत पात्र झोपडीधारकांना कायमस्वरूपी पुनर्वसन सदनिका देण्यात येईपर्यंतच्या कालवधीकरीता भाड्याची रक्कम देण्याचे विकसकाने दि ०५/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये हमीपत्र देऊन मान्य केले आहे. आणि

ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची पुर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र दि.१५ ते २१ सप्टेंबर २०२२ तसेच दै.महाराष्ट्र निरोप्या व दै.पुढारी या वृत्तपत्रात दि.१३/०९/२०२२ रोजी प्रसिध्द करणेत आली असून सदरची पुर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रकारे योजनाक्षेत्रात दि.१३/०९/२०२२ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि

ज्याअर्थी, उपरोक्त पूर्वसूचनेतील नमूद ३० दिवसांच्या कालावधीत सदर क्षेत्रातील प्रत्येक झोपडी पाडून त्याखालील क्षेत्र मोकळे करून ती जागा विकसक यांच्या ताब्यात देण्यास फर्मावण्यात आले होते. तथापि, सदर योजना क्षेत्रावरील सर्व झोपडयांचा ताबा प्राप्त असल्याचे विकासक मे.गंगा कन्स्ट्रक्शन्स, यांनी दि ०४/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे; आणि

ज्याअर्थी, सदर क्षेत्रातील उपरोक्त ३० दिवसांच्या कालावधीत रिकाम्या करण्यात न आलेल्या झोपड्यांचे / दुकानांचे सक्तीने निष्कासन करून ती जागा पुनर्वसन योजना राबविणेकामी मोकळी करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **नीलेश गटणे,** मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे उक्त अधिनियमाच्या कलम ३ड मधील नमूद तरतूदीन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करीत आहे. तसेच सदरच्या क्षेत्रामधील उपरोक्त ३० दिवसांच्या कालावधीत रिकाम्या करण्यात न आलेल्या झोपड्यांचे / दुकानांचे सक्तीने निष्कासन करून या आदेशाची अंमलबजावणी करण्यास उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.१, झोपुप्रा पुणे यांना प्राधिकृत करीतआहे.

उक्त क्षेत्रातील सर्व झोपडीधारकांना प्रस्तुत आदेशाद्वारे कळविण्यात येत आहे की,

१) उक्त क्षेत्रावरील प्रत्येक झोपडी व बांधकाम या मधील झोपडीधारकांनी उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये त्यांची झोपडी रिकामी करून झोपडी व त्याखालील जागा तात्काळ विकसकाच्या ताब्यात द्यावी.

२) पुर्वसूचनेमध्ये देण्यात आलेली ३० दिवसांची मुदत संपुष्टात आलेली असल्याने या कार्यालयामार्फत सदर क्षेत्रातील झोपडीधारकांचे यानंतर केंव्हाही सक्तीने निष्कासन करण्यात येईल. सक्तीने निष्कासित करण्यात आलेला कोणताही पात्र झोपडीधारक त्याचा संक्रमण कालावधीतील सदनिकेचा / भाडेपोटीच्या रकमेचा अधिकार गमावेल.

३) सदरच्या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात येईल व यापुढे सदर क्षेत्रातील झोपडीधारकांना निष्कासनासंदर्भातील कोणतीही स्वतंत्र नोटीस या कार्यालयामार्फत देण्यात येणार नाही.

४) कोणत्याही झोपडीधारकाने विहीत मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास / झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास / झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास असा झोपडीधारक, मग तो पात्र असो अथवा अपात्र, उक्त अधिनियमाच्या कलम ३झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

५) उक्त अधिनियमाच्या कलम १२(८) अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीत प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे तसेच इमारतीतील सामानाची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना तसेच त्यानी प्राधिकृत केले आहे अशा उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.१, झोपुप्रा पुणे यांना राहतील.

६) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती दोषसिद्धिअंती उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा १००० रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

सदरच्या आदेशामुळे व्यथित होणा-या कोणत्याही व्यक्तीस अथवा झोपडीधारकास उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सह कलम १२ (४) अन्वये ३० दिवसांचे आत शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ यांचेकडे अपिल दाखल करता येईल आणि उक्त अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची

झोपडपट्टीचे नाव : टांगेवाला कॉलनी
महानगरपालिका क्षेत्र : पुणे.

| गाव | स.नं. | क्षेत्र ( चौ. मी.) | जमीनीचे मालकी हक्क / विकसन हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती / संस्थेचे नाव | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| पर्वती | स.नं.८०,८१ सि.स.नं २१९२/१ ते २१९२/१३ पैकी | ४२४७.१६ चौ. मी. | महाराष्ट्र शासन पट्टेधारक, टांगेवाला सहकारी गृहरचना संस्था मर्या. विकसन हक्क - मे.गंगा कन्स्ट्रक्शन्स | पुर्वेस - लागू अंबिल ओढा | |
| | | | | पश्चिमेस - लागू रस्ता व टांगेवाला सहकारी गृह. संस्था | |
| | | | | दक्षिणेस - लागू रस्ता | |
| | | | | उत्तरेस - लागू न.भू.क्र.२०७८ | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- / /२०२३

19.5.23

नीलेश गटणे (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

कार्यवाहीस्तव प्रत -

१) संबंधित झोपडीधारक

२) उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र. १, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
सदर जाहीर प्रकटन योजना क्षेत्रात प्रसिध्द करणेकरीता.

३) विकासक मे.गंगा कन्स्ट्रक्शान्स, रा.सन माहू कॉम्प्लेक्स , ३ रा मजला बंड गार्डन रोड,पुणे-४११००१

माहितीस्तव प्रत -

१) मा. जिल्हाधिकारी, पुणे

२) मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे

३) व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६
वरिल अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करून त्याच्या ५ प्रति या कार्यालयास देयकासह पुरविण्यात याव्यात हि विनंती.